स्थापना :) (२ जुन १९७५

दि. वांगव्हली को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि. मुंबई नं. ३

रजिस्टर नं. BOM/RSR/705 सन १९७५

विना सहकार नही उद्धार

लेखा परिक्षकांच्या श्रेयास पात्र राहून

★ अकरावा वार्षिक अहवाल ★

सन १९८५–८६

ऑफिस पत्ता :

१३-ई, चकला क्रॉस लेन, कापडवाला बिल्डींग, १ला माळा,
रुम नं. ४, मुंबई–४०० ००३.

दि वांगव्हॅली को-ऑपरेटीव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड, मुंबई

—: संस्थापक :—

श्री. बाबुराव तुकाराम डाकवे

श्री. आत्माराम निवृत्ती थोरात

—: कार्यकारी मंडळ :—

अध्यक्ष :- श्री. पांडूरंग रामचंद्र चव्हाण
उपअध्यक्ष :- श्री. बाबुराव शंकर सावंत
सचिव :- श्री. शिवाजीराव गणपती डाकवे
उपसचिव :- श्री. शामराव रामचंद्र पवार
खजिनदार :- श्री. बाबुराव तुकाराम डाकवे

—: सदस्य :—

श्री. आत्माराम निवृत्ती थोरात
श्री. जयसिंग यशवंत बोत्रे
श्री. विष्णू कृष्णा तेटमे
श्री. हिंदूराव बंडू मोहिते
श्री. शंकरराव रामचंद्र माटेकर

श्री. वसंतराव शंकर रोडे
श्री. निवृत्ती बापूराव लोटळे
श्री. शंकर दगडू चव्हाण
श्री. बापूराव लक्ष्मण पाटील
श्री. आनंदा मारूती नांगरे

—: अंतर्गत हिशेब तपासणीस :—

श्री. भगवानदास बी. पाटणवाला C. A

—: कायद्याचे सल्लागार :—

श्री. निवृत्ती मारूती कचरे B. A. L L. B adv. High Court
श्री. अशोक केशव पोफळे B. A. L L. B.

—: सल्लागार मंडळ :—

श्री. यशवंत बाळू लोटळे
श्री. रघुनाथ ज्ञानू डाकवे

श्री. नारायण भाऊ पाटील
श्री. वसंत बंडोबा खैरमोडे

श्री. राजाराम बापू कात्रे

—: बँकर्स :—

दि मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेड

दि वांगव्हॅली को-ऑपरेटीव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड, मुंबई

—: ११ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सुचना :—

या सुचनेद्वारे संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते कि संस्थेची आकरावी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक ९–११–१९८६ रोजी सकाळी ९–०० वाजतां मुंबई देशस्थ मराठा ज्ञाति धर्म संस्था, रघुनाथ महाराज स्ट्रीट, मांडवी कोळीवाडा, मुंबई–४०० ००३. येथे होणार आहे. सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.

—: सभेपुढील विषय :—

१) सभेच्या अध्यक्षांची निवड करणे.

२) २०–१०–१९८५ रोजी झालेल्या १० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा इतिवृत्तांत ताळेबंद पत्रक वाचून मंजूर करणे.

३) ३०–६–१९८६ अखेरच्या वर्षाचा कार्यकारी मंडळाचा अहवाल, नफा तोटा पत्रक ताळेबंद पत्रक व नफा विभाजनास मंजुरी देणे.

४) हिशोब पर्यवेक्षाकडून अहवाल मिळाल्यास सादर करणे.

५) सन १९८६–८७ सालाकरीता हिशोब तपासनीस नियुक्त करणे व मेहंताना ठरवणे.

६) पोट-नियम दुरूस्ती स्विकारणे (परिशिष्ट सोबत जोडले आहे)

७) मा. अध्यक्षांच्या परवानगीने इतर विषय.

संचालक मंडळाच्या हुकुमावरून

श्री. शिवाजीराव गणपती डाकवे

सचिव

—: सुचना :—

१) गणसंख्येच्या अभावी तहकुब झालेली सभा त्याच जागेवर आर्ध्या तासानंतर घेण्यात येईल व त्या सभेला गणसंख्येचे बंधन राहणार नाही.

२) ज्या सभासदांना कांही सुचना करावयाच्या असतील तर संस्थेकडे दि. १/११/१९८६ पर्यंत लेखी सुचक व अनुमोदक याच्या सहीने आणून द्याव्यात.

३) सन १९७९-८० सालाचा लाभांश ३०–१२–८६ पर्यंत घेऊन जाणे तद्नंतरा नियमानुसार सदर वर्षाचा लाभांश गंगाजळी वर्ग करण्यात येईल.

दि वांगव्हॅली को-ऑपरेटीव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड, मुंबई

११ वा वार्षिक अहवाल सन १९८५-८६

सन्माननीय सभासद बंधु भगिनीनो !

संस्थेचा ३० जुन १९८६ अखेरचा वार्षिक अहवाल व आर्थिक पत्रके मंजूरीसाठी सादर करण्यास कार्यकारी मंडळास अत्यानंद वाटतो. अहवाल सालात संस्थेच्या प्रगतीची वाटचाल कौतुकास्पद असुन नेत्रदीपकभरीव कामगीरी केली आहे त्याचे प्रतिबिंब ३० जुन १९८६ अखेरच्या आर्थिक पत्रकांमध्ये ठळक दिसुन येते.

सभासद :-

गतवार्षिक अहवालानुसार संस्थेची सभासदत्वा संख्या १७८१ होती अहवाल सालात २४९ व्यक्तींनां सभासत्व देण्यात आले. २८ सभासदांनी राजीनामे दिल्यामुळे अहवालसाली सभासद संख्या २००२ आहे.

भाग भांडवल :-

गतवार्षिक अहवालानुसार संस्थेचे भागभांडवल रुपये ६,६७,७४०-०० होते अहवाल सालात रुपये १,८८,०२०-०० चे भाग भांडवल जमा झाले रुपये १३,५२०-०० भाग रक्कम परत केली. वर्षाअखेर भाग भांडवलाची रक्कम रुपये ८,४२,२४०-०० झाली आहे.

गंगाजळी व इतर निधी :-

गतवार्षिक अहवालानुसार संस्थेची रुपये ८३,९७७-५५ निधी जमा होती अहवाल सालात रुपये ५३,४३२-२४ वाढ झाली दिनांक ३०-६-१९८६ अखेर रुपये १,३७,४०९-७९ निधी जमा आहे.

बँक कर्ज :-

वर्षारंभी दि मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. यांचे ३,४०,०००-०० कर्ज शिल्लक होते. सभासदांच्या अर्थिक गरजा भागविण्यासाठी संस्थेने अहवालात रुपये ५,००,०००-०० कर्ज घेतले असुन रुपये ४,०५,०००-०० कर्ज परत फेड केले आहे. अहवालसाला अखेर रुपये ४,३५,०००-०० कर्ज देणे आहे.

ठेवी :-

१, मुदतठेव :- गतवार्षिक अहवालानुसार रुपये २४,५००-०० मुदत ठेव जमा होती. अहवालसालात रुपये १७,५००-०० मुदत ठेव जमा झाली वर्षा अखेर रुपये ४२,०००-०० मुदत ठेव जमा आहे.

२, मासिकसंचोतठेव :- अहवालसालात संस्थेने मासिक संचित ठेव योजना सुरू केली असुन वर्षाअखेर एकुण रुपये १७,०३० ०० जमा आहेत.

" थेंबेथेंबे तळे साचे " याउक्तीनुसार प्रत्येक सभासदाने मासिक ठेव जमा करावी.

३, सक्तीचीबचतठेव :– सभासदांना बचत करण्याची सवय जडावी म्हणुन संस्थेने सक्तीची बचत ठेव सुरू केली आहे. वर्षाअखेर रुपये १,०२,९५५–०० ठेव जमा झाली आहे.

सभासदांनी आपल्या उन्नतीसाठी सहकारी सभासदाच्या मदतीसाठी आणि संस्थेच्या प्रगतीसाठी जास्तीतजास्त रक्कम मुदत ठेव संस्थेत ठेवावी व प्रत्येकांने आपले मासिक संचित ठेव खाते सुरू करून बचत करावी असे आव्हान करत आहे.

कर्जवाटप :–

सभासदाचा अर्थिक विकास साधुन कर्जाच्या विळख्यातून सुटका करण्याचा संस्थेचा दृष्टोकोन आहे. आणि म्हणून संस्थेने अनेक सभासदांना लघुउद्योग सुरू करून दिले आहेत. सभासदांना मारवाडी कर्जातून मुक्त करून लहान मोठी कार्येकरण्यात मदत केली आहे. गत अहवालानुसार रुपये १२,९६,५५०–०० कर्ज येणे बाकी होते. अहवालसालात १४,१३,१००–०० कर्ज वाटप केले रुपये १०,४३,९००–०० कर्ज वसुल केले आहे. ३०–६–१९८६ अखेर रुपये १६,६५,७५०–०० कर्ज येणे बाकी आहे.

थकबाकी :–

थकबाकी हा सहकारी संस्थेस जडलेला कर्करोग असुन त्याचे विपरीत परिणाम संस्थेच्या अर्थिक प्रगतीवर होतात. सभासदांने जाणीवपुर्वक दखल घेऊन कर्जाच्या हप्त्याची नियमीत परत फेड करून थकबाकीचा कर्करोग संस्थेपासुन दूर ठेवावा हि विनंती.

गुंतवणुक :–

१, दि मुंबई जिल्हामध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेडचे गतवर्षी रुपये ४०,०००–०० भाग घेतले होते अहवालसालात रुपये १०,०००–०० चे भाग खरेदी केले असुन वर्षाअखेर रुपये ५०,०००–०० गुंतवणुक केली आहे.

२, संस्थेने अहवालसालात भक्कम आर्थिक प्रगतीसाठी मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेडमध्ये रुपये १,००,०००–०० ठेव ठेवली आहे.

उत्पन्न :–

संस्थेच्या नफ्यामध्ये सतत वाढ झाली आहे. त्याचा प्रत्यय ३० जून १९८६ रोजी संपलेल्या वर्षातील रकमेवरून दिसुन येतो. सदर वर्षात संस्थेला रु. १,४७,१७७-८२ निव्वळ नफा झाला. मागील वर्षातील शिल्लक नफा रुपये ५२–०३ मिळून एकूण रुपये १,४७,२२९-८५ नफा विभाजनासाठी उपलब्ध आहे. संचालक मंडळाने सोबत जोडलेल्या नफा विगतवारी पत्रकानुसार विभाजन व्हावे अशी शिफारस केली आहे.

लेखा परिक्षकांचा अहवाल :-

संस्थेचा सरकारी हिशेब पर्यवक्षेकाकडून सन १९८२-८३ प्रर्यंतचा अहवाल मिळाला असुन संस्थेस ' अ ' वर्ग दिला आहे हे अभिमानाने सांगावे वाटते सदर अहवाल आपणास मंजूरीस सादर करत आहे.

संचालक मंडळ :-

संचालक मंडळातील सर्व सदस्यांनी अविरत परिश्रम घेऊन संस्थेचा व्यवहार उत्तम रितीने संभाळला आहे. सांचालक मंडळाच्या एकूण १६ सभा झाल्या सदर सभांना प्रामुख्याने सर्व सदस्यांनी उपस्थित राहून एकमताने कामकाज पाहिले आहे.

श्रद्धांजली :-

आपल्या देशाचे माजी उपपंतप्रधान "श्री जगजीवनराम" यांच्या निधनाने भारतीय दुर्बल घटकाचा नेता हरपला आहे. थोर नेत्याच्या निधनाबद्दल संचालक मंडळाने दुःख व्यक्त केले आहे मृत्तआत्मास परमेश्वर चिरशांती देवो.

भारताचे माजी सरसेनापती मा. "अरूणकुमार वैद्य" या थोर लढवय्याची कांही माथेफिरूनी भ्याड खुनीहत्या केली, संचालक मंडळाने निषेध करून परमेश्वरास त्यांच्या मृतआत्म्यास शांती देण्याची प्रार्थना करत आहे.

संस्थेचे सभासद

आभार :-

संस्थेच्या वतीने व स्वतः दि मुंबई जिल्हामध्यवर्ती सहकारी बँक लि. चे पदाधिकारी व कर्मचारी यांचे सहकार्य मिळाल्याबद्दल मी त्याचे मनःपुर्वक आभार मानतो.

संस्थेचे सर्व सभासदानी व पदाधिकरत्यानी संस्थेच्या प्रगतीस प्रामाणिक मदत आणि दिलेल्या सहकार्याबद्दल आभारी आहे.

संस्थेचे कर्मचारी श्री कुंडलीक विठ्ठल घारे व श्री. यशवंत गणपत पवार यांनी हिशेब व्यवस्थीत ठेऊन संस्थेचे लिखाण काम वेळेचे बंधन न पहातापुर्ण केल्याबद्दल आणि श्री. शंकर गणपती डाकवे यांनी सर्वोपरी मदत केल्याबद्दल संस्थेच्यावतीने मी त्यांचा आभारी आहे.

संस्थेस भविष्यात अधिक वैभवाचे व समृध्दीचे दिवस लाभोत सहकार जीवनाचा हा इवलासा वेल ध्येयपुर्तीसाठी सतत फैलावत राहिल. आपले सहकार्य आनंतःकाळ निष्ठेने चालू ठेवील. आपणास सादर केलेला अहवाल आपण स्विकृत करून घ्याल ही अपेक्षा.

आपला सहकारी

श्री. पांडूरंग रामचंद्र चव्हाण

अध्यक्ष

दि वांगव्हॅली को-ऑपरेटीव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड, मुंबई

३० जुन १९८६ अखेरच्या नफ्याची विगतवारी पत्रक

तपशील	रुपये पै.	तपशील	रुपये पै.
मागील वर्षी शिल्लक नफा	५२-०३	गंगाजळी २५% प्रमाणे	३६,८०७-४६
अहवालसालात निव्वळ नफा	१,४७,१७७-८२	बुडीत कर्ज निधी १०% प्रमाणे	११,०४२-२०
		इमारत निधी	२३,०००-००
		लाभांश समिकरण निधी	१०,०००-००
		लाभांश वाटप ९% प्रमाणे (३०-१०-८५ अखेर)	६६,१७३-४०
		पुढील वर्षाकरीता शिल्लक	२०६-७९
	१,४७,२२९-८५		१,४७,२२९-८५

श्री. पांडूरंग रामचंद्र चव्हाण (अध्यक्ष)

श्री. शिवाजीराव गणपती डाकवे (सचिव)

श्री. बाबुराव तुकाराम डाकवे (खजिनदार)

दि वांगव्हॅली को-ऑपरेटीव्ह

१ जुलै १९८५ ते ३० जुन १९८६

अ. क्र.	तपशील		जमा रुपये पै.	नांवे रुपये पै.
१	प्रवेश फी		२४९-००	
२	भागभांडवल		८,४२,२४०-००	
३	सरळ व्याज व दंड व्याज		२,३०,५८७-८३	
४	पासबुक व इतर		४,६७८-७०	
५	भागावरील लाभांश		४,०२६-५०	
६	मुदतठेव व्याज जमा		८५०-६८	
७	गंगाजळी		७६,८९७-३५	
८	बुडीत कर्ज निधी		२२,०६३-४४	
९	इमारत निधी		३८,२००-००	
१०	अनामत ठेव		८६१-००	
११	मुदत ठेव		४२,०००-००	
१२	सक्तीची बचत ठेव		१,०२,५३५-००	
१३	मासीक संचीत ठेव		१७,०३०-००	
१४	लाभांश वाटप शिल्लक		६८,९४५-२०	
१५	बँक कर्ज		४,३५,०००-००	
१६	शिल्लक नफा		५२-०३	
१७	छपाई व स्टेशनरी	(तरतूद)	६,८३५-७५	
१८	बँक व्याज	,,	१९,७७४-७०	
१९	शिक्षण निधी	,,	५००-००	
२०	कर्मचारी बोनस	,,	१,६००-००	
२१	हिशेब तपसणीस फी	,,	६,०५०-००	
२२	मुदत ठेवीवरील व्याज	,,	८,६१०-८८	
२३	स. बचत ठेव व्याज	,,	४,३२१-५०	
२४	मासीक संचीत ठेव व्याज	,,	७३९-५६	
२५	दिर्घ मुदतीचे कर्ज			१६,६५,७५०-०
२६	मुदत ठेव			१,००,०००-०
२७	गुंतवणुक			५०,०००-०
२८	फर्निचर			८,१५४-९
	पुढील पानावर चालू		१८,३४,६४९-१२	१८,२३,९०४-९

क्रेडिट सोसायटी लिमिटेड, मुंबई

अखेर बाकी पत्रक

अ. क्र.	तपशील	जमा रुपये पै.	नांवे रुपये पै.
	मागील पानावरून	१९,३४,६४९-१२	१८,२३,९०४-९०
२९	छपाई व स्टेशनरी		४,८७६-००
३०	प्रवास खर्च		३६३-००
३१	किरकोळ खर्च		३,४१९-४०
३२	ऑफिस भाडे		३,६००-००
३३	मेहंताना खर्च		१६,०३१-००
३४	पोष्टेज खर्च		८४०-१५
३५	बोर्ड फी		५०-००
३६	ऑफिस डिपॉझीट		५००-००
३७	बँक व्याज		१९,४९९-१८
३८	विमा खर्च		२००-००
३९	हॉल भाडे		२००-००
४०	लवाद खर्च		२,८९५-००
४१	मुदत ठेव व्याज (तरतूद)		५,३१४-५५
४२	सक्तीची बचत ठेव व्याज ,,		४,३२१-५०
४३	संचीत ठेव व्याज ,,		७३९-५६
४४	छपाई व स्टेशनरी ,,		६.८३५-७५
४५	बँक व्याज ,,		१९,७७४-७०
४६	कर्मचारी बोनस ,,		१,६००-००
४७	शिक्षण निधी		५००-००
४८	हिशोब तपासणीस फी ,, ,,		२,५००-००
४९	फर्निचर घसारा ,, ,,		९०६-१०
५०	बँक शिल्लक ,, ,,		१५,७०८-९५
५१	हातातील रोख शिल्लक ,, ,,		६९-३८
	एकूण	१९,३४,६४९-१२	१९,३४,६४९-१२

भगवानदास बी. पाटनवाल C. A.
(अंतर्गत हिशोब तपासणीस)

श्री. पांडूरंग रामचंद्र चव्हाण (अध्यक्ष)
श्री. शिवाजीराव ग. डाकवे (सचिव)
श्री बाबुराव तुकाराम डाकवे (खजिनदार)

दि वांगव्हॅली को-ऑपरेटिव्ह क्रेडिट

१ जुलै १९८५ ते जुन १९८६

१९८४-८५ रुपये पै.	खर्च	रुपये पै.	१९८५-८६ रुपये पै.
१३,५३१-६५	मेहनताना	१६,०३१-००	
	अधिक : अहवालसालात बोनस (तरतूद)	१,६००-००	१७,६३१-००
१२,९३९-६०	छपाई व स्टेशनरी	४,८७६-००	
	अधिक : अहवालसालात तरतुद	६,८३५-७५	
		११,७११-७५	
	वजा : अहवालसालात शिल्लक	१,५००-००	१०,२११-७५
३,९००-००	कार्यालय भाडे		३,६००-००
३८,४६९-१६	बँक कर्ज	१९,४९९-१८	
	अधिक : अहवालसालात तरतुद	१९,७७४-७०	३९,२७३-८८
२,१४७-४७	किरकोळ खर्च		३,४१९-४०
१,२३५-६०	टपाल व तार खर्च		८४०-१५
	लवाद खर्च		२,८९५-००
५०-००	मुंबई सहकारी बोर्ड फी		५०-००
३००-००	सभागृह भाडे		२००-००
	विमा खर्च		२००-००
	प्रवास खर्च		३६३-००
२५०-००	जाहीरात व प्रसिध्दी		
१५००-००	हिशोब तपासणीस फी तरतुद	२,५००-००	
५००-००	शिक्षण निधी ,,	५००-००	
३,२९६-३३	मुदत ठेव व्याज ,,	५,३१४-५५	
	बचत ठेव व्याज ,,	४,३२१-५०	
	संचित ठेव व्याज ,,	७३९-५६	१३,३७५-६१
६३१-३०	मालमवत्तेरील १०% प्रमाणे घसारा		९०६-१०
१,०६,१०१-०४	निव्वळ नफा		१,४७,१७७-८२
१,८४,८५२-१५			२,४०,१४३-७१

श्री. भगवानदास बी. पाटणवाला (सी. ए.)
अंतर्गत हिशोब तपासणीस

श्री. बाबुराव तुकाराम डाकवे
खजिनदार

सोसायटी लिमिटेड मुंबई–४०० ००३.
अखेरचे नफा तोटा पत्रक

१९८४–८५ रुपये पै.	उत्पन्न	१९८५–८६ रुपये पै.
१,७९,६५४-५५	सरळ व्याज व दंड व्याज	२,३०,५८७-८३
१,८३५-००	पासबुक व इतर जमा	४,६७८-७०
३,३६२-५०	भागावरील लाभांश जमा	४,०२६-५०
	मुदत ठेवीवरील व्याज	८५०-६८
१,८४,८५२-०५		२,४०,१४३-७१

श्री. शिवाजीराव गणपती डाकवे (सचिव)

श्री. पांडूरंग रामचंद्र चव्हाण (अध्यक्ष)

दि वांग व्हॅली को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सं

१ जुलै १९८५ ते ३० जुन १९८६

१९८४-८५ रुपये पै.	भाग भांडवल व जबाबदाऱ्या	रुपये पै.	१९८५-८६ रुपये पै.
०,००,०००-००	अधिकृत भाग भांडवळ :-		१०,००,०००-०
	भाग भांडवल :-		
६,६७,७४०-००	मागील वर्षी वसुल प्रत्येकी १० रु. प्र.	६,६७,७४०-००	
	अधिक : अहवाल सालात जमा	१,८८,०२०-००	
		८,५५,७६०-००	
	वजा : अहवाल सालात परत	१३,५२०-००	८,४२,२४०-०
	राखीव निधी :-		
४९,६७१-६९	मागील वर्षाच्या अहवालानुसार	४९,६७१-६९	
	अधिक : २५% प्र. मागील वर्षी ज.	२६,५२५-२६	
	अधिक : अहवाल सालात प्रवेश फी	२४९-००	
	अधिक : अहवाल सालात १९७८-७९ चा लाभांश	७००-४०	७७,१४६-३
१४,१०५-८६	बुडीत कर्ज निधी		२२,०६३-४
२०,२००-००	इमारत निधी		३८,२००-०
	ठेवी :-		
२४,५००-००	मुदत ठेव	४२,००० ००	
४३,२१५-००	सक्तीची बचत ठेव	१,०२,५३५-००	
	मासिक संचित ठेव	१७,०३०-००	
६,६६८-००	अनामत ठेव	८६१-००	१,६२,४२६-०
	बँक कर्ज :-		
३,४०,०००-००	दि मुंबई जि. मध्यवर्ती सहकारी बँक कर्ज		४,३५,०००-०
८५,०६१-५८	**इतर देणी :-**		
	लांभाश शिल्लक	६८,९४५-२०	
	ठेवीवरील व्याज (तरतुद)	१३,६७१-९४	
	बँक व्याज ,,	१९,७७४-७०	
	छपाई व स्टेशनरी ,,	६,८३५-७५	
	हिशोब तपासणीस फी ,,	६,०५०-००	
	कर्मचारी बोनस ,,	१,६००-००	
	शिक्षण निधी ,,	५००-००	१,१७,३७७-५
	नफा :-		
२७-०३	मागील वर्षी शिल्लक नफा	५२-०३	
१,०६,१०१-०४	अहवाल सालात निव्वळ नफा	१,४७,१७७-८२	१,४७,२२९-८
१३,५७,२९०-२०			१८,४१,६८३-२

श्री. भगवानदास बी. पाटनवाला C. A.
(अंतर्गत हिशोब तपासणीस)

श्री बाबुराव तुकाराम डाक
(खजिनदार)

सोसायटी लिमिटेड, मुंबई.

अखेरचे ताळेबंद पत्रक

१९८४–८५ रुपये पै.	मालमत्ता (येणी)	रुपये पै.	१९८५–८६ रुपये पै.
१३,५५९-२०	**रोख व बँक शिल्लक :–**		
	हातातील रोख शिल्लक	६९-३८	
	बँकेतील शिल्लक	१५,७०८-९५	१५,७७८-३३
२,९६,५५०-००	**दिर्घ मुदतीचे कर्ज :–**		
	मागील वर्षीच्या अहवालानुसार	१२,९६,५५०-००	
	अधिक : अहवालसालात वाटप	१४,१३,१००-००	
	वजा : अहवालसालात वसुल	१०,४३,९००-००	१६,६५,७५०-००
४०,०००-००	**गुंतवणुक :–**		
	दि मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेडचे भाग	५०,०००-००	
	दि मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेडमध्ये ठेव	१,००,०००-००	१,५०,०००-००
५,६८१-००	**फर्निचर :–**		
	मागील वर्षाच्या अहवालानुसार	५,६८१-००	
	अधिक : अहवालसालात खरेदी	३,३८०-००	
		९,०६१-००	
	वजा : १०% प्रमाणे घसारा	९०६-१०	८,१५४-९०
१,५००-००	ऑफिस डिपोझीट		५००-००
	स्टेशनरी शिल्लक		१,५००-००
३,५७,२९०-२०			१८,४१,६८३-२३

श्री. शिवाजीराव ग. डाकवे
(सचिव)

श्री. पांडूरंग रामचंद्र चव्हाण
(अध्यक्ष)

दि वांगव्हॅली को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड, मुंबई४०० ००३.

कार्यकारी मंडळाने शिफारस केलेली पोट-नियम दुरूस्ती

पोटनियम क्रमांक	अस्तित्वात असलेले पोटनियम	नियोजीत बदल	शेरा
क. १. २	**भाग भांडवल :—** संस्थेचे अधिकृत भाग भांडवल रु. १०,००,०००-०० असेल. सदर अधिकृत भाग भांडवल निबंधकांच्या वेळोवेळी घेतलेल्या विशिष्ट परवानगीने वाढविण्यास मुभा राहिल. प्रत्येक भागाची किंमत १० रु. राहिल. ती किंमत एका रकमेने भरली पाहीजे.	संस्थेचे अधिकृत्त भाग भांशवल रु. २५,००,०००/- असेल. सदर अधिकृत भाग भांडवल निबंधकाच्या वेळोवेळी घेतलेल्या विशिष्ट परवानगीने वाढविण्यास मुभा राहिल. प्रत्येक भागाची किंमत १० रुपये राहिल. ती किंमत एका रकमेने भरली पाहिजे.	सध्याची भाग भांडवलाची मर्यादा पुर्ण झाल्यामुळे सदर बदल करण्यात येत आहे.
फ. १. १	**कर्ज** सदस्याना शे. १८% वार्षिक व्याजाच्या दराने व्यवस्थापक समितीने मान्य केलेल्या अगर दोन सदस्याच्या वैयक्तीक आणि (कोणताच बोजा नसलेल्या) ऋणको सदस्याच्या स्थावर मिळकतीवर कर्ज देता येईल. ह्या पोटनियमाच्या कोणत्याही एका अगर अधिक नियमाच्या तरतुदीन्वे कोणीही सदस्य ५०००/- रु. पेक्षा अधिक रकमेस संस्थेचा कर्जदार नसला पाहिजे. संस्थेच्या एकूण भांडवलाच्या एक चतुर्थांश पेक्षा अधिक रक्कम एका वर्षापेक्षा अधिक मुदती करिता आणि (एकूण भांडवलाच्या) एक अष्टमांश पेक्षा अधिक रक्कम दोन वर्षापेक्षा अधिक मुदती करिता कर्जाऊ देता येणार नाही. जर कर्जाच्या रकमा व्यवस्थापक समितीच्या एका तरी सदस्याच्या उपस्थित दिल्या गेल्या [illegible]जेत.	सदस्याना शे. १८% वार्षिक व्याजाच्या दराने व्यवस्थापक समितीने मान्य केलेल्या अगर दोन सदस्यांच्या वैयक्तीक आणि (कोणताच बोजा नसलेल्या) ऋणको समस्याच्या स्थावर मिळकतीवर कर्ज देता येईल. ह्या पोट नियमाच्या (कोणत्याही एका अगर अधिक नियमाच्या) तरतुदीन्वे कोणीही सदस्य १०,०००/- रु. पेक्षा अधिक रकमेस संस्थेचा कर्जदार नसला पाहिजे संस्थेच्या एकूण भांडवालाच्या अधिक एक चतुर्थांश पेक्षा अधिक रक्कम एका वर्षापेक्षा मुदती करिता आणि (एकूण भांडवलाच्या) एक अष्टमांश पेक्षा अधिक रक्कम ५ वर्षापेक्षा अधिक मुदती करिता कर्जाऊ देता येणार नाही जर कर्जाच्या रकमा रोख दिल्या तर त्या रकमा व्यवस्थापक समितीच्या एका तरी सदस्याच्या उपस्थितीत दिल्या गेल्या पाहि[illegible]	सभासदाच्या मागणीवरून त्यांच्या अर्थिक गरजा पुर्ण करून संस्थेची उन्नती होण्यासाठी.

	सदस्याच्या उपस्थित दिल्या गेल्या [illegible]जत.	तरी सदस्याच्या उपस्थितीत दिल्या गेल्या पाहि[illegible]	
६. १.२	५०००/– रु. पर्यंत कर्जाऊ रकमा व्यवस्थापक समितीने संमत केलेल्या दोन सदस्याच्या वैयक्तीक जामीनावर देता येईल.	स्थावर मिळकतीच्या गहाणवटीवर कर्ज देता येईल परंतु कर्ज दिलेली रक्कम स्थावर मिळकतीच्या मुळ किंमतीच्या ७०% पेक्षा जास्त असता कामा नाही अशा स्थावर मिळकतीच्या सर्व प्रकारच्या धोक्यासाठी विमा उतरविला पाहिजे आणि त्यावरच, व्यवस्थापक समितीच्या संमतीने ऋणको सदस्याचा वैयक्तिक जामिन (सीक्युरिटी) घेतली पाहिजे. १०,०००/– रु. पर्यंत कर्जाऊ रकमा व्यवस्थापक समितीने संमत केलेल्या दोन सदस्याच्या वैयक्तीक जामीनावर देता येईल.	सभासदांच्या अर्थिक गरजा भागविण्यासाठी आणि संस्थेच्या उन्नतीसाठी.
ह. २.१	खजिनदार आणि चिटणीस किंवा व्यवस्थापक समितीने या बाबतीत अधिकार दिलेल्या समितीच्या सदस्यास स्वतः जवळ शंभर रुपयापेक्षा अधिक अगर नोंदणी अधिकाऱ्याची पुर्वमंजुरी घेऊन अधिकार दिल्या गेलेल्या रकमेपेक्षा अधिक रक्कम रोख बाकी म्हणून ठेवता येणार नाही संस्थेच्या रोख रकमेची ताब्याची जबाबदारी अंगावर असलेल्या संस्थेच्या अधिकाऱ्यांनी उपयुक्त मर्यादे पेक्षा अधिक असलेल्या रकमा बँकेत अगर सर्वात अधिक जवळ असलेल्या रकमा (त्या बँकेच्या) शाखेत ताबोडतोब भरून टाकल्या पाहिजेत.	खजिनदार आणि चिटणीस किंवा व्यवस्थापक समितीने या बाबतीत अधिकार दिलेल्या समितीच्या सदस्यास स्वतः जवळ १०००/– रु. पेक्षा अधिक अगर नोंदणी अधिकाऱ्याची पुर्वमंजुरी घेऊन अधिकार दिल्या गेलेल्या रकमेपेक्षा अधिक रक्कम रोख बाकी म्हणून ठेवता येणार नाही संस्थेच्या रोख रकमेची ताब्याची जबाबदारी अंगावर असलेल्या संस्थेच्या अधिकाऱ्यांनी उपयुक्त मर्यादेपेक्षा अधिक असलेल्या रकमा बँकेत अगर सर्वात अधिक जवळ असलेल्या त्या बँकेच्या शाखेत ताबोडतोब भरून टाकल्या पाहिजेत.	संस्थेच्या वाढत्या कारभारमुळे.

आय १.३(क)	सध्या पोटनियम कांही नाही	पुर्ण भरणा झालेल्या भाग भांडवलापैकी शे. २ टक्के पेक्षा जास्त नसलेली रक्कम लाभांश समिकरण निधीमध्ये त्या निधीची एकूण रक्कम भाग भांडवलाच्या शे. ९ टक्के इतकी होईपर्यंत भरावी लाभांश देण्या व्यतिरिक्त या निधीतून कोणताही पैसा निबंधकाच्या लेखी संमती शिवाय काढता येणार नाही,	संस्थेच्या वाढत्या कारभारामुळे.
आय १.४	जाहीर केलेल्या तारखेपासुन ३ वर्षापर्यंत कोणत्याही भागावरील नफा संबधित सदस्याने घेतला नाही तर समितीने त्याला नोटीस पाठवून नोटीशिच्या तारखेपासून सएक महिण्याच्या आत त्याने तो घ्यावा असे त्याला कळविले पाहिजे. त्या मुदतीत जर त्याने लाभांश घेतला नाही तर तो वैधानिक गंगाजळीत (**Statutory Reserve Fund**) टाकण्यात येईल.	जाहीर केलेल्या तारखेपासुन ६ वर्षापर्यंत कोणत्याही भागावरील नफा संबधित सदस्याने घेतला नाही तर स मतीने त्याला नोटीस पाठवून नोटीशीच्या तारखेपासून एक महिण्याच्या आत त्याने तो घ्यावा असे त्याला कळविले पाहिजे त्या मुदतीत जर त्याने लाभांश घेतला नाही तर तो वैधानिक गंगाजळीत (**Statutory Reserve Fund**) टाकण्यात येईल.	सभासदाच्या विनंतीवरून.

"बाकी संमती पत्रक"

दि वांगव्हॅली को-ऑपरेटीव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड, मुंबई

१३, चकला क्रॉस लेन, कापडवाला बिल्डींग, पहिला माळा,
खोली नं. ४, मुंबई-४०० ००३.

खाते नंबर

श्री./श्रीमती ______________________________

३० जून १९८६ अखेरचा तपशील	ठेव	भाग रुपये	कर्ज येणे बाकी

सुचना :

वरील दर्शविलेल्या भागाची रक्कम व कर्ज येणे बाकी योग्य असल्यास आपण फॉर्मवर सही करून संस्थेच्या ऑफिसमध्ये आणून देण्याची कृपया नोंद घ्यावी. जर आपल्याकडून फॉर्म न मिळाल्यास वरील दर्शविलेल्या रकमा योग्य आहेत असे गृहित धरण्यात येईल, कळावे.

सभासदाची सही

दि वांगव्हॅली को-ऑपरेटीव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड, मुंबई

❋ सभासदांना विशेष सुचना ❋

१) सोसायटीतून केवळ कर्ज मिळविणे हा उद्देश ठेऊ नका. तर आपल्या मिळकतीतून नियमित काही बचत करण्याची सवय लावून घ्या.

२) सोसायटीचे कामकाज सहकारी कायदा नियम अधिनियम यांना अनुसरून करावे लागते तेव्हा आपल्या व्यवहारासंबंधी काही अडचण असल्यास ती समजुतीने घ्या व सेक्रेटरीना सहकार्य द्या.

३) कर्जासाठी एकमेकांच्या विश्वासाने तिघांचे गट कायम करा. वरचेवर त्यात बदल होऊ देऊ नका.

४) महिन्याचे पगार १, ७, १० तारखेला होतात. तेव्हा कर्जाचे हप्ते भरण्यासाठी म्हणजे १५ तारखेपर्यंत थांबू नका. त्यापूर्वीच भरत चला.

५) सोसायटीची स्थापना ही सर्व सभासदांना अल्प व्याजावर कर्ज पुरवठा करणे आणि कर्जमुक्ती करण्यासाठी असून नफा मिळविण्यासाठी नव्हे.

६) कर्जाची थकबाकी हा दुर्धर रोग आहे. त्याने कर्जफेड न होता कर्जाची मर्यादा वाढते.

७) कर्जदारास सवलतीची सहानुभूती म्हणजे कर्ज माफ नव्हे.

८) आपण ज्यास जामीन आहात तो अर्जदार नियमित कर्ज परतफेड करतो की नाही याची खात्री करून घ्या.

९) संस्थेच्या उन्नतीसाठी संस्थेत भरघोस ठेवी जमा करा.

१०) संस्थेकडून जलद सेवा मिळण्यासाठी आपले पासबुक सोबत घेऊन येण्यास विसरू नये.

११) शिस्त हा माणसाच्या उत्कर्षाचा पाया होय.

दि. वांगव्हॅली को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि. मुंबई.

ठेवी वरील आकर्षक व्याजाचे दर

१) सक्तीची बचत ठेव :– १०%

२) मासिक संचित ठेव :–

१) १० महिन्यासाठी ९%

२) २४ महिन्यासाठी १०%

३) ४८ महिन्यासाठी ११%

४) ६० महिन्यासाठी १२%

३) मुदत ठेव :–

एक वर्ष ते दोन वर्षापर्यंत ९.५%

दोन वर्ष ते तीन वर्षापर्यंत १०%

तीन वर्ष ते चार वर्षापर्यंत १०.५%

चार वर्ष ते पांच वर्षापर्यंत ११%

पाच वर्षा पेक्षा जास्त १२%

मुद्रक : शिगण प्रिंटर्स, मुंबई-४०० ००२.